# जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद.

आरोग्य सेवा

फोन :०२४०-२३३१०१९,
फॅक्स :२३४१८९२
ई-मेल :csaurangabad2@gmail.com

जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, व्हीआयपी रोड,
आमखास मैदान,औरंगाबाद-४३१००१.
(महाराष्ट्र शासन) 1942-52
जा.क्र.जिशचिऔ/ /१४
दि. २७/०३/२०१४

प्रति,

१. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) औरंगााबाद.
२. आयुक्त,अन्न व औषध प्रशासन,औंरगबाद.
३. जिल्हा शिक्षण अधिकारी, जि.प.औंरगबाद.
४. विक्रीकर आयुक्त,औंरगाबाद.
५. जिल्हा माहिती अधिकारी औंरगाबाद.
६. आयुक्त,म.न.पा.औरंगाबाद.
७. जिल्हा कामगार अधिकारी.
८. जिल्हा कृषी अधिकारी औरंगाबाद.
९.गट विकास अधिकारी औरंगाबाद.
१० मराठवाडा ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद.

**विषयः-** राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमातंर्गत दि.१५/०३/२०१४ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय समन्वयक समितीच्या त्रैमासिक बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, जिल्हा स्तरावर गठीत करण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय समन्वयक समितीची त्रैमासिक बैठक (DLCC) मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे दिनांक १५.०३.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीचे इतिवृत्त आपणांस कळविण्यात येत आहे.

करिता माहितीस्तव सादर

सोबत बैठकिचे इतिवृत्त

जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, औरंगाबाद.

प्रतः- १. मा सहसंचालक,असंसर्गजन्य रोग,आरोग्य सेवा, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद.यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner

# राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हास्तरीय समन्वय समिती बैठकीचे इतिवृत्त

मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५/०३/२०१४ रोजी राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस जिल्हास्तरीय समन्वय समितीचे खालील सदस्य उपस्थित होते. १)श्री.राजेश ईतवारे,उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन,२) डॉ.जी.एम.गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक,औरंगाबाद ३) श्रीमती.व्ही.आर.थोरात, जिल्हा माहिती अधिकारी ४) श्री.ए.ए.पवार, उपआयुक्त अन्न व औषध प्रशासन यांचे प्रतिनिधी, ५) श्री.सी.डी.वनसोडे, शिक्षणाधिकारी (प्रतिनिधी) ६) श्री.पी.बी.अव्हाळे,कृषी उपसंचालक, औरंगाबाद,७) श्री.ए.जे.उगले.प्रकल्प संचालक,मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,औरंगाबाद इ, सदस्य उपस्थित होते.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन औरंगाबाद यांनी तंबाखू नियंत्रण कायदा २००३ व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समिती बैठकीस उपस्थित सर्वांचे स्वागत केले. त्यांनी बैठकीच्या अजेंडयाची माहिती व बैठकीचा उद्देश सांगितला. त्यांनंतर जिल्हा शल्यचिकित्सक,सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांनी जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रम कक्षातंर्गत केलेल्या कार्याची माहिती दिली.

या बैठकीमध्ये खालील मुददयांवर चर्चा करण्यात आली.

१) मागील बैठकीचे ईतिवृतांत वाचून ईतिवृतांस मंजुरी देण्यात आली.

२) दर तीन महिन्यांनी जिल्हास्तरिय समितीची बैठक सातत्याने घेण्यात यांवी असे सर्वानुमते ठरले.

३) अन्न व औषध प्रशासन यांच्या समन्वयांने तंबाखू विषयक जाहिरातीवर निकषा प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

४) शाळेच्या परिसरा मध्ये (शैक्षणिक परिसरामध्ये) तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीचे दुकाने तसेच धुम्रपानास सक्त बंदी असल्याचे ठळक अक्षरातील फलक शाळेच्या परिसरात दर्शनी भागात लावण्यात यांवा याची जबाबदारी मुख्याध्यापकावर निश्चित करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५) कृषी,शैक्षणिक,सार्वजनिक ठिकाणी सर्व शासकिय कार्यालयाचे परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस व सेवनांस प्रतिबंधाबावत त्या त्या विभाग प्रमुखांनी कार्यवाही करावी.

६) जिल्हा स्तरांवर तंबाखू नियंत्रण कायदा २००३ कलम ५ बाबत सनियंत्रण समितीची बैठक आयोजित करणेबाबत सुचना देण्यात आल्या.



Scanned by CamScanner

७) तंबाखू नियंत्रण कायदा २००३ ची माहिती सर्व सदस्यांना देण्यात आली.

८) तालुका स्थरावर सर्व अधिकाऱ्यांची कार्यशाळा घेण्यात येईल असे श्री.आप्पासाहेब उगले. प्रकल्प संचालक मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,औरंगाबाद यांनी सांगीतले.

९) समितीने केलेल्या कार्यवाही बाबत प्रसार माध्यमांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.

१०) तंबाखू नियंत्रण कायदा २००३ प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी क्षेत्र निश्चित करुन आपसात समन्वय साधून कार्यवाही करावयाची तारीख निच्छीत करावी व सर्व विभागातील अधिकाऱ्यांचे सहकार्य घेऊन कार्यवाही करावी.

११) जिल्हास्तरिय समन्वय समितीच्या बैठकीस गैरहजर राहणाऱ्या समितीच्या सदस्यास गैरहजर असणे बाबत कळवावे.

१२) ३१ मे २०१४ जागतिक तंबाखु विरोधी दिन निमित्ताने जिल्हास्तरावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. ईत्यादी विषयांवर सर्व सदंस्यांनी चर्चा करुन निर्णय घेतले.

उपस्थित सर्व सन्माननिय सदस्यांचे श्री.जी.एम.गायकवाड. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुगणालय औरंगाबाद यांनी आभार मानून मा.अध्यक्षांच्या संमतीने बैठक समाप्त झाल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा शल्यचिकित्सक,तथा सदस्य/सचिव
जिल्हा तंबाखु नियंत्रण कार्यक्रम.
औरंगाबाद.

जिल्हाधिकारी,तथा अध्यक्ष
जिल्हा तंबाखु नियंत्रण कार्यक्रम.
औरंगाबाद.



Scanned by CamScanner

जा.क्र.२०१५/भुसुधार/आरोग्य/रातंनिका/कावि- २७
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.
दिनांक ३ /५/२०१४

प्रति,
कार्यालय प्रमुख,
शासकिय कार्यालय / संस्था, (सर्व)
जिल्हा औरंगाबाद

विषय:- COTPA Act 2003 Section 04 व 06 अंतर्गत सर्व शासकीय कार्यालय तसेच शैक्षणीक संस्थामध्ये धुम्रपान मनाई व तंबाखू प्रतिबंधक विरोधी फलक लावणे बाबत.

उपरोक्त विषयी ,आपणांस कळविण्यात येते की, शासन निर्णयानुसार सर्व शासकीय कार्यालयामध्ये COTPA Act 2003 Section 04 अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास व तंबाखू/गुटखा सेवन करण्यास सक्त मनाई असून शासकीय कार्यालयाचे आवारात थुंकण्यास देखील मनाई आहे. COTPA Act 2003 section 06 अंतर्गत सर्व शैक्षणीक संस्थांच्या 100 मीटरच्या परिसरात कुठलाही तंबाखुजन्य पदार्थ विक्री करण्यास बंदी आहे.100 मीटरच्या परिसरात तंबाखू, सिगारेट व तंबाखुजन्य पदार्थ विक्री करता येत नाही,असल्यास त्या कार्यालयाचे प्रमुख शाळेचे मुख्याध्यापक यांनी ती विक्रीची दुकान काढून टाकण्याविषयी संबधितास लेखी पत्र दयावे.याची जबाबदारी मुख्याध्यापकावर निच्छीत करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

करिता आपणांस कळविण्यात येते की,आपले कार्यालयाचे ठळक दर्शनी भागात फलक लावण्यात यावे.वरिल प्रमाणे लेखी सुचना खाते प्रमुखांनी त्यांच्या दुय्यम कार्यालयास दयाव्यात.

**टिप** :- सदरील फलक कशाप्रकारे असावे याबाबतची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे तरी सर्व फलक त्याच प्रमाणे लावण्यात यावे.

जिल्हाधिकारी,औरंगाबाद.

प्रतः- १. मा सहसंचालक (असंसर्गजन्य रोग),आरोग्यसेवा मुबंई यांना माहितीस्तव सादर.

जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

Scanned by CamScanner

| Design of the signage | Specification of the board |
|---|---|
|  No Smoking Area – Smoking Here Is an Offence | 1.The board shall be of minimum size of 60cm by 30 cm of white background.<br>2. It shall contain a circle of no less than 15 cm outer dimeter with a red perimeter of no less than 3cm wide with a picture,in the center,of a cigarette or beedi with black smoke and crossed by a red band.<br>3.The width of the red band across the cigarette shall equal width of the red perimeter.<br>4. The board shall contain the warning "No Smoking Area-Smoking Here Is an Offence ",in english or one indian language,as applicable. |

## As per COTPA ACT-2003 Guideline

PTO

Scanned by CamScanner

जा.क्र.जिपऔ/7-प्रशासन/2011
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक 18.6.2011

प्रति,
खाते प्रमुख सर्व
जिल्हा परिषद औरंगाबाद

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा औरंगाबाद

गट विकास अधिकारी (सर्व)
पं.स. जिल्हा औरंगाबाद

विषय - कार्यालयाच्या परिसरात तंबाखु सेवन व धुम्रपान नियंत्रण करणे बाबत.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, दिनांक 18.6.2011 रोजी समन्वय सभेत मराठवाडा ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद या संस्थेमार्फत **Advancing Tobacco Control in Aurangabad Dist.** या विषयावर सविस्तर माहिती दिलेली आहे. शासकीय कार्यालये, शाळा हे सिगारेट, तंबाखु सेवन विरहित करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय तंबाखु सेवन नियंत्रण धोरण स्विकारले असुन 2003 (COTPA) ला कायदा केलेला आहे व शासकीय कार्यालये शाळा या ठिकाणी तंबाखु सेवन नियंत्रणासाठी 60 X 30 से.मी. आकाराचा प्रथमदर्शनी भागात फलक लावण्याबाबत सुचना दिलेल्या आहे. सन 2008 मध्ये झालेल्या कायदयानुसार सार्वजनिक ठिकाणी जसे शासकीय कार्यालये, शाळा महाविदयालये रुग्णालये, रेल्वेस्टेशन, पोस्ट ऑफिस या ठिकाणी धुम्रपानास मनाई आहे व या परिसरात कोणी धुम्रपान केल्यास रु 200/- पर्यंत दंड आकारता येतो. राष्ट्रीय तंबाखु सेवन नियंतण धोरणानुसार जिल्हा स्तरावर मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **Dist. Tobacco Controll Cell** स्थापन केलेला आहे.

तरी आपणास सुचित करण्यात येते की, आपण आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात तंबाखु सेव विरोधी फलक लावावेत व कार्यालयाच्या परिसरात कोणी धुम्रपान केल्यास अथवा तंबाखु सेवन केल्यास रुपये 200/- पर्यंत दंड आकारण्यात येईल या विषयी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी. शासकीय कार्यालय, शाळापासुन 100 यार्डात तंबाखु सिगारेट व तंबाखुजन्य गुटखा विक्री करता येत नाही, असल्यास त्या कार्यालयाचे प्रमुख शाळेचे मुख्याध्यापक यांनी ती विक्रीची दुकान काढून टाकण्याविषयी संबंधितास लेखी पत्र दयावे. वरील प्रमाणे लेखी सुचना खाते प्रमुखांनी त्यांच्या दुय्यम कार्यालयास दयाव्यात.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

Scanned by CamScanner